पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी ४११०१८. लेखा विभाग ७७७५६

क्रमांक:- लेखा/पेन्शन/३२/कावि/ /२०२१

दिनांक:- ०६ / ८ /२०२१

विषय:- सेवानिवृत्ती वेतन/कुटुंबनिवृत्ती वेतन प्रकरणे ऑनलाईन संगणक प्रणालीतून सादर करणे बाबत./ई-पेन्शन प्रणाली लागू करणे बाबत..

परिपत्रक

महाराष्ट्र नागरी सेवानिवृत्ती वेतन नियम १९८२ नुसार शासकीय कर्मचारी सेवेतून नियतवयोमान सेवानिवृत्ती, स्वेच्छा सेवानिवृत्ती, कुटुंब निवृत्तीवेतन, वैदयकीय सेवानिवृत्ती, सक्तीने सेवानिवृत्ती इ.प्रकरणे व इतर लाभ मंजूरीकामी संबधीत विभागाकडून लेखा विभागाकडे प्राप्त होतात. निवृत्तीवेतन/कुटुंब निवृत्तीवेतन, सेवाउपदान /मृत्युउपदान मंजूरीकामी आवश्यक असलेले फॉर्म नमुना १, ३, ५, ६, १०, १२, १६, पेन्शन विक्री नमुना ए, प्रपत्र अ, संबंधीत विभागाने अचूक भरणे आवश्यक आहे. तथापी सदरचे फॉर्म अचूक/परिपूर्ण भरले जात नाही. अशी अपुर्ण/चुकीची माहिती भरलेली प्रकरणे विभागाकडे पुर्ततेसाठी परत पाठविले जातात.परिणाम संबंधीतांस मुदतीत लाभ अदा करणत येत नाही. अचूक/परिपूर्ण पेन्शन प्रकरणे वेळेत प्राप्त होण्याचे दृष्टीने ऑनलाईन संगणक प्रणाली तयार करणेत आली आहे. तिच्या वापराबाबत माहिती खालीलप्रमाणे आहे.

संगणक प्रणालीत मनपाच्या संकेतस्थळावर **मुखपृष्ठ – कर्मचा-यांसाठी इंट्रानेट-पगारबील - ई-पेन्शन- ई पेन्शन फॉर्म मध्ये जावून सेवानिवृत्तीचा प्रकार निवडणे,** फॉर्म अचूकपणे भरुन, सिंगल/जॉईंट फोटो अपलोड करुन, त्यानंतर ई - रिपोर्टमधून प्रिंट काढून आवश्यक त्याठिकाणी विभागप्रमुखांच्या स्वाक्षरीने साक्षांकन करून नस्तीबध्द करणे.

तपासणीसूची प्रमाणे नस्तीबध्द केलेले प्रकरण स्वयंस्पष्ट शिफारशीसह, अदयावत केलेले सेवानोंद पुस्तक मंजूरीकामी लेखा विभागाकडे पाठविणेत यावे. ऑनलाईन फॉर्म भरताना काही अडचणी आल्यास मोबाईल नंबर 9766913678 (विकासकुमार) यांचेशी संपर्क साधावा.

सदर परिपत्रकान्वये सर्व सबंधीत विभागप्रमुख/शाखाप्रमुख यांना सुचीत करणेत येते की, १) नमुना १ नामनिर्देशीत व्यक्तींचा तपशील २) रजेचा हिशोब विनावेतनी बाबत तपशील, ३) कर्ज वसूली, येणे रक्कमांचा तपशील, ४) वेतननिश्चीती, वार्षीक वेतनवाढी अदा केलेले वेतन, इ. बाबींच्या सेवानोंद पुस्तकातील अचूक नोंदी व संगणक प्रणालीत भरलेली माहिती याबाबत खातरजमा करुनच संगणक प्रणालीतून प्राप्त होणाऱ्या निवृत्तीवेतन प्रकरणी आवश्यक फॉर्म नमुना १, ३, ५, ६, नमुना ए, प्रपत्र अ, कुटुंब निवृत्तीवेतन प्रकरणी नमुना १, १०, १२, १६, प्रपत्र अ ची हार्डकॉपी स्वाक्षरी करावी. प्राप्त होणा-या फॉर्म प्रपत्र अ मधील काही त्रुटी/चुकांमुळे सेवानिवृत्तीवेतन/सेवाउपदान/कुटुंब निवृत्तीवेतन/मृत्युउपदान रक्कम कमी जादा अदा झाल्याचे आढळून आल्यास त्यास सर्वस्वी संबंधीत विभागप्रमुख जबाबदार रहातील. तसेच, दिनांक २० /९/२०२१ पासून संगणक प्रणाली मधूनच सर्व पेन्शन प्रकरणे लेखा विभागाकडे स्वीकारली जातील. संगणक प्रणालीत नसलेली प्रकरणे स्वीकारली जाणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

आयुक्त

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी १८.

प्रति

सर्व विभाग